असतांना दुसरे ओलीत करावे. एकच ओलीत करणे शक्य असल्यास पीक फुलावर असतांना ओलीत करावे.

काढणी व मळणी :

झाडावरील शेंगा ७५ टक्के पिवळ्या पडल्यानंतर व शेंगातील दाणे टणक होऊ लागताच मोहरी पीक काढणीस आले असे समजावे. काढणी योग्यवेळी करावी. जमिनी लगत कापणी करून लहान ढीग करून ७-८ दिवस शेतातच वाळू द्यावे. नंतर लगेच बैलाच्या पायाखाली तुडवून काठीने बडवून मळणी करावी. मोहरीच्या पिकापासून हेक्टरी ८ ते १२ क्विंटल उतपादन होते.

मोहरीचे सुधारीत वाण व त्यांचे गुणधर्म

वाण	फुलोऱ्यावर येण्याचा कालावधी (दिवस)	परिपक्व येण्याचा कालावधी (दिवस)	१०० दाण्याचे वजन (ग्रॅम)	दाण्याचा रंग	तेलाचे प्रमाण (%)	हेक्टरी उत्पादन (क्विं)
टीएएम - १०८-१	४५-५०	१००-११०	४.५-५.५	काळसर	८-१२	३५-४०
शताब्दी (एसीएन ९)	४०-४२	९५-१०५	२.९-४.०	काळसर करडा	८-१२	३२-४०

मोहरीचे पिकावरील किडी व रोग व त्यांचे नियत्रण

मावा

उपाययोजना :

या किडीचा पादुर्भाव पिकाच्या सुरवातीपासून ते पीक निघेपर्यत राहतो. ही किड झाडाच्या पानातून व इतर कोवळ्या भागातून रस शोषण करते. तीव्र प्रादुर्भाव असल्या पाने विळी पडून वाळतात, तसेच रोपाची वाढ खुंटते. ढगाळ व आर्द्र हवामान माव्याच्या वाढीस अनुकूल राहते. या किडीच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मि.ली. थयोमेटॉन २५ टक्के प्रवाही ८ मि.ली., क्विनॉलफॉस ३५ टक्के प्रवाही २० मि.ली. मॅलाथिऑन ५० टक्के प्रवाही १० मि.ली., यापैकी कोणत्याही एका किटकनाशकाची १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. किंवा कार्बारील १० टक्के यापैकी एका भुकटीची प्रति हेक्टरी २० किलो प्रमाणे धुरळणी करावी.

भुरी, पांढरा तांबेरा, करपा

उपाययोजना :

या रोगांच्या नियंत्रणासाठी मॅन्कोझेब किंवा कॅप्टॅफॉल हे बुरशीनाशक ३० ग्रॅम, १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

टिप : अनेक रसायनाचे एकत्र मिश्रण करून फवारणी करणे टाळावे व सुरक्षित फवारणी तंत्राचा अंगीकार करावा.



घडी पत्रिका क्र. : डॉ. पंदेकृवि/प्रका/१५९५/२०२५

मोहरी लागवड तंत्रज्ञान



डॉ. किशोर कि. झाडे
वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रमुख

डॉ. प्रितम एन. चिरडे
विषय विशेषज्ञ
(कृषिविद्या)

श्री. नरेश पी. बुध्देवार
विषय विशेषज्ञ
कृषि हवामानशास्त्र)

श्री. पुष्पक ए. बोथीकर
विषय विशेषज्ञ (पिक संरक्षण)

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

कृषि विज्ञान केंद्र

सोनापूर-गडचिरोली

दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३०१७
Email - kvksonapur@gmail.com
Website - www.kvkgadchiroli.in

जमीन :

मोहरीच्या सलग पिकासाठी मध्यम ते भारी प्रकारच्या जमिनीची निवड करावी. तसेच पाण्याचा चांगला निचरा होणे, पिकाच्या जोमदार वाढीच्या दृष्टीने फार महत्वाचे आहे.

पुर्वमशागत :

खरीप पिकाची कापणी झाल्यानंतर जमीन नांगरून, वखरून तयार करावी. ओलीताखाली पीक घ्यावयाचे झाल्यास वखराच्या किंवा सारा यंत्राच्या सहाय्याने ङ्गसारेफ पाडावेत. त्यामुळे पाणी चांगले समप्रमाणात उपयोगात आणले जाते.

बीज प्रक्रिया :

पेरणीपुर्वी थायरम ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळावे. पेरणीच्या आधी रात्री बियाणे आलेसर पोत्यात ठेवले असता उगवण चांगली होते.

पेरणीची वेळ :

ऑक्टोबरचा शेतवटचा आठवडा ते नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवाड्यत.

पेरणीची पध्दत :

५ किलो प्रति हेक्टरी बियाणे वापरावे. कोरडवाहू मोहरीची पेरणी जमिनीत ओल असतांना ४५ सें.मी. अंतर ठेवून करावी. या पिकाचे बियाणे आकाराने लहान असल्यामुळे मोहरीची वाळू समप्रमाणात मिसळून नंतर पेरणी करावी. त्यामुळे बियाणे सर्व क्षेत्रात सारखे पडण्यास मदत होते व पीक दाट होत नाही. बियाणे ३ ते ४ सें.मी. खोल ओलीत पडेल अशा बेताने पेरावे. बियाणे जास्त खोल पडणार नाही याची काळजी घ्यावी. ओलीताखालील मोहरीच्या पेरणीपूर्वी एक ओलीताची पाळी देऊन वापसा येताच पेरणी करावी. पाणी देण्यासाठी ङ्गसारेफकाढावेत.

विरळणी / खाडे भारणे :

पेरनीनंतर १५ दिवसांनी विरळणी करावी. यावेळी झाडातील अंतर १० ते १५ सें.मी. ठेवावे, म्हणजे शेतात हेक्टरी १.५ ते २.२ लाख रोपांची संख्या राहतील.

आंतरपिके :

गव्हाबरोबर आंतरपिक ९:१ या प्रमाणात ओळीमध्ये पेरणी केल्यास अधिक फायदेशीर ठरते असे या केंद्रावरील प्रयोगात दिसून आले.

रासायनिक खतांचे व्यवस्थापन :

निश्चित ओलीताची सोय असल्यास हेक्टरी ५० किलो नत्र व ४० किलो स्फुरदाची मात्रा घ्यावी. त्यापैकी २५ किलो नत्र (५४ किलो युरीया) व ४० किलो स्फुरद (२५० किलो सिंगल सुपर फॉस्फेट) पेरणीच्या वेळेस द्यावे



व उर्वरीत २५ किलो नत्र (५४ किलो युरिया) परेणीनंतर २५ ते ३० दिवसांनी पहिल्या ओलिताच्या वेळी द्यावी. उत्पादन वाढीसाठी प्रति हेक्टरी २० किलो गंधक आणि १ किलो बोरॉन पेरणीच्या वेळीच द्यावे. कोरडवाहू परिस्थितीत प्रति हेक्टरी ४० किलो नत्र (८७ किलो युरीया) व २० किलो स्फुरद (१२५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) द्यावे. कोरडवाहू मोहरी पिकास १ टक्के युरिया ५० टक्के फुलोरा अवस्थेत फवारणी करावी. मोहरीच्या अधिक उत्पादनासाठी आणि आर्थिक परताव्यासाठी सॅलिसिलिक ॲसिडची २०० पीपीएमची फवारणी (२ ग्रॅम सॅलिसिलिक ॲसिड) १० लिटर पाण्यात मिसळून फुलोऱ्यावर आणि शेंगा लागण्याच्या वेळी करण्याची शिफारस केली आहे.

आंतरमशागत :

उगवणीनंतर ५० दिवसांच्या काळात मोहरी पिकाच्या प्रभावी तण नियंत्रण, अधिक उत्पादन व अधिक आर्थिक मिळकतीकरीता पेरणीपासून २० व ४० दिवसांनी २ निंदण व २ डवरणी करण्याची किंवा ऑक्सीडायरजील (८० टक्के पाण्यात विरघळणारी भुकटी) ९० ग्रॅम क्रियाशील घटक किंवा पेंडीमिथॅलिन (३० टक्के ई.सी.) १ किलो क्रियाशील घटक प्रति हेक्टरी उवगण पूर्व फवारणी करावे.

ओलीताचे व्यवस्थापन :

मोहरी हे पीक ओलीताखाली व कोरडवाहू दोन्ही परिस्थितीत घेता येते. निश्चित ओलीताची सोय असल्यास उवगणीनंतर २५ ते ३० दिवसाच्या अंतराने ओलीताच्या तीन पाळ्या द्याव्या. दोनच ओलीताच्या पाळ्या देणे शक्य असल्यास पेरणीनंतर एक महिन्याने पहिले व पीक फुलांवर